**नियमीत फौ. ख. क्र. ४६/२०२२**

**सरकार वि. सुरेश + १**

**निशाणी– ३३.**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची जबानी.**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**
**माझे नाव –** अनिकेत जगन्नाथ निंबाळकर,
**वय–** २६ वर्ष– धंदा– शिक्षक.
**राहणार –** दहिवद, ता. चांदवड, जि. नाशिक.

..................................................................................................

**सरकारपक्षाच्या वतीने साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. आर. एम. वाळके यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

०१. दिनांक ०४/०२/२०२२ रोजी पोलिस हवालदार बागुल यांनी मला कोलटेक फाटयावर बोलाविले होते. माझ्या सोबत मच्छींद्र कासव हजर होते. पोलिस हवालदार बागुल यांनी मला घटनास्थळ दाखविले होते. गाडी क्रं. एम. एच. १६– ए.६१८१ ही दगड गोटे असेलेला मुरुम घेवून जात होती. त्यावेळी गाडी मालक त्या ठिकाणी आले होते व त्यांच्यात बोलणे झाले व त्यानंतर ते गाडी घेवून निघूण गेले. त्या गाडीमध्ये मुरुम व दगड होते. त्यांच्याकडे परवाना नसल्याने पंचनामा केला होता. घटनास्थळी पुर्वेला – जमादास खांगळ यांचे शेत व गाळे, पच्छीमेला– बखळ जागा, दक्षिणे– उत्तर चांदवड लासलगाव महामार्ग आहे. पोलिसांनी पंचनामा तयार केला व तो वाचून मी त्यावर सही केली आहे. आता साक्षीदाराला नि. क्रं. २४ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. ए. टी. देवरे वकिल यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी पाटे गावातील स्थानीक रहिवासी नाही. दहिवद ते पाटे गावचे दिड कि. मी. अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस पाटलांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस पाटलाला पाहिले नाही,

तो आमच्यासोबत पंचनाम्याला हजर नव्हता. पंचनामा १० वाजता सुरु झाला व साधारण १०.४५ वाजता संपला. त्यावेळी लोक जमा झाले होते, मला त्यांची नावे सांगता येणार नाही. माझे पोलिस स्टेशनला जाणे–येणे नाही. मी पोलिस हवालदार बागुल यांना ओळखत होतो. त्यांचे गावात येणे जाणे असल्याने माझी ओळख होती. हे म्हणणे खरे नाही की, मला बागुल हवालदार बोलवत होते व मी नेहमी जात होतो. आमच्यासमोर बागुल ट्रकवर चढले होते. मला त्या ट्रकमध्ये प्रत्यक्ष काय होते हे माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास काही नाही.**
**वा. दा. कबूल केले.**

समक्ष,

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.18 17:39:58 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड .**
**दि. १८/१२/२०२५.**

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.12.18 17:40:03 +0530

**(एस. एस. छल्लाणी)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**चांदवड.**